# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडल, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १४७/२०११-१२/ दिनांक :

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. शिवाप्पा मल्लाप्पा बसर्गी,<br>मु.पो. सिध्दनाथ, ता. जत, जि. सांगली. | अर्जदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १) | कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,<br>सं व सु मंडल कार्यालय, सांगली | विरुध्द पक्षकार |
| २) | कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली | |
| ३) | सहाय्यक अभियंता,<br>म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | |

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. शिवाप्पा मल्लाप्पा बसर्गी, मु.पो. सिध्दनाथ, ता. जत, जि. सांगली यांनी मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी संख उप विभाग विरुध्द तक्रार दि. ८.१२.२०११ रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

This document was created using SmartPDFCreator. To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

अर्जदार यांनी आपल्या शेतीपंपास नवीन वीज जोडणी मिळावी यासाठी वि.प.कडे अर्ज करुन दि. १३.१०.२०१० रोजी रु. ५०००/- पावती क्र. ५३४८७९७ नुसार भरले व चाचणी अहवाल दि. १६.१२.२०१० रोजी दिला आहे. तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. १३.९.२०११ ला तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाने दि. ११.११.२०११ रोजी कृती मानके विनियमातील तरतुदीप्रमाणे विहीत कालावधीत वीज पुरवठा देण्यात यावा असे आदेश दिले. मंचाकडून अपेक्षित मदत - वीज पुरवठा देण्याचे वि.प.ला आदेश व्हावेत, विलंब निश्चित झाला असलेस कृती मानके विनियमानुसार भरपाई मिळावी, विलंबाची निश्चिती झाली नसलेस कृती मानके विनियमानुसार ग्राहक भरपाईसाठी वेगळा अर्ज करणेस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

वितरण कंपनीने नोटीस देऊनही मुदतीत दि. २८.१२.२०११ पर्यंत आपला लेखी अहवाल सादर केला नाही तो दि. ११.१.२०१२ रोजी सुनावणीचेवेळी मंचासमोर दाखल केला. त्यामध्ये अर्जदार ग्राहकाने त्यांच्या नवीन शेतीपंप कनेक्शनसाठी दि. १३.१०.२०१० ला चलन भरल्याचे व चाचणी अहवाल दि. १६.१२.२०१० रोजी दिल्याचे मान्य केले आहे. त्यांचे एकूण ०.२४ कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम आहे. एप्रिल २०१० ते मार्च २०११ पर्यंतची कामे मार्च २०१२ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दीष्ट आहे. तक्रारदाराचे काम विहीत मुदतीत पूर्ण करण्यात येईल. तसेच संख उप विभागात असणारा डोंगराळ भाग यामुळे वीज पुरवठा देण्यास विलंब झालेला आहे. ही बाब लक्षात घेवून त्यांनी मागितलेली नुकसान भरपाई मान्य करण्यात येवू नये अशी विनंती केली आहे.

प्रस्तुतची तक्रार दि. ११.१.२०१२ रोजी मंचासमोर सुनावणीस घेण्यात आली. तक्रारदार गैरहजर. ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित. वि.प.तर्फे नोडल ऑफीसर श्री. क्षीरसागर, सहाय्यक अभियंता संख उप विभाग श्री. कदम, कनिष्ठ अभियंता श्री. कुलकर्णी उपस्थित. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी दि. २८.२.२०१२ पर्यंत ग्राहकास वीज जोडणी देण्यात येईल असे मंचासमोर सांगितले. ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे यांनी वि.प.अधिकाऱ्यांनी कबूल केल्याप्रमाणे वीज जोडणी दिल्यास विलंबापोटी भरपाईची मागणी सोडून देत असल्याचे मंचासमोर सांगितले.

## कारणमिमांसा

उभयबाजूंच्या कथनानुसार अर्जदार ग्राहकाने नवीन शेतीपंप वीज पुरवठा मिळणेसाठी चलन भरुन चाचणी अहवाल वितरण कंपनीकडे दिला आहे. वि.प.च्या एप्रिल २०१० ते मार्च २०११ या उद्दीष्ट ठरविलेल्या कालावधीत ग्राहकाच्या अर्जाचा कालावधी येत आहे. त्यानुसार तक्रारदार ग्राहकाचे काम विहीत मुदतीत दि. २८.२.२०१२ पर्यंत पूर्ण करण्याचे वि.प.च्या अधिकाऱ्यांनी कबूल मंचासमोर केले आहे. ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे यांनी वि.प.च्या अधिकाऱ्यांनी कबूल केल्याप्रमाणे दि. २८.२.२०१२ पूर्वी वीज जोडणी दिल्यास विलंबापोटी भरपाईचे हक्क सोडून देत असल्याचे मंचासमोर मान्य केले आहे. खालील प्रमाणे आदेश -

This document was created using Smart PDF Creator. To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

## आदेश

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वि.प.च्या अधिकाऱ्यांनी कबूल केल्याप्रमाणे दि. २८.२.२०१२ पूर्वी ग्राहकास वीज जोडणी देऊन वीज पुरवठा सुरु करुन द्यावा. त्याचा कार्यपूर्ती अहवाल मंचास त्वरित द्यावा.

३) वि.प.च्या अधिकाऱ्यांनी कबूल केल्याप्रमाणे दि. २८.२.२०१२ पर्यंत ग्राहकास वीज जोडणी दिली नाही तर ग्राहक भरपाई स्वतंत्ररित्या मागू शकतो.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखे-पासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक :

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com